गोपनीय/अतितात्काळ

क्र. पोमसं/२/प्रतिनियुक्ती-बदली/(भोईटे)/९२/२०१७
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,**
**मुंबई- ४०० ००१.**
दिनांक :- २० /०९/२०१७.

**संदर्भ :-** शासन आदेश, गृहविभाग, क्र. रापोसे-२२१७/प्र. क्र. १४६/पोल-१ (अ), दिनांक १९/०९/२०१७ (प्रत सलग्न)

**विषय :-** **<u>प्रतिनियुक्तीवर बदलीबाबत</u>**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी, जि. अहमदनगर (प्रतिनियुक्तीने)**

* * * * * *

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने श्री साईबाबा महासमाधी शताब्धी महोत्सव, २०१७-१८ च्या पार्श्वभूमीवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे शताब्ध्दी कक्ष स्थापन करण्यासाठी श्री साईबाबा संस्थानच्या आस्थापनेवर श्री आनंद अप्पासाहेब भोईटे, उपविभागीय पोलीस अधिकारी, अहमदनगर ग्रामीण उपविभाग, जि. अहमदनगर यांची प्रतिनियुक्तीव्दारे नियुक्ती करण्यात आली आहे. प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याबाबतचे संदर्भाधिन शासन आदेश याद्वारे कळविण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | पोलीस उप अधीक्षकाचे नांव | सध्याच्या नियुक्तीचे ठिकाण | नवीन नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | श्री आनंद अप्पासाहेब भोईटे | उपविभागीय पोलीस अधिकारी, अहमदनगर ग्रामीण उपविभाग, जि. अहमदनगर | श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी (प्रतिनियुक्तीने) |

२. तरी घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

अ. संदर्भाधिन शासन आदेशांच्या अनुषंगाने उचित कार्यवाही तात्काळ करुन तसा अनुपालन अहवाल सत्वर या कार्यालयास सादर करावा.

आ. प्रतिनियुक्तीच्या (नवीन नियुक्तीच्या) ठिकाणांसंदर्भात मा. न्यायालयाचे, अथवा मा. न्यायाधिकरणाचे स्थगिती आदेश असल्यास, ते विचारात घेऊन पुढील कार्यवाही करावी.

इ. सदर आदेशांची प्रत, तसेच प्रतिनियुक्तीच्या (नवीन नियुक्तीच्या) ठिकाणी हजर होण्यासाठी कार्यमुक्त करण्याबाबतच्या आदेशांची प्रत संबंधीत अधिकाऱ्यांना व्यक्तीश: अदा करुन ती त्यांना प्राप्त झाल्याबाबत त्यांची दिनांकासहित स्वाक्षरी घ्यावी, व ती पोंच या कार्यालयास पाठवावी. तसेच, वरील अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करण्यात येऊ नये.

ई. सदर नियुक्तीच्या आदेशांमुळे ज्या जागा रिक्त होणार आहेत, त्या पदांचे कार्यभार संबंधीत घटक प्रमुखांनी घटकातील इतर पोलीस अधिकाऱ्यांकडे सोपवावेत.

उ. उपरोक्त आदेशांच्या अनुषंगाने संबंधीत अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीच्या ठिकाणी **विनाविलंब कार्यमुक्त** करुन त्यांनी त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या (नवीन नियुक्तीच्या) पदांवर तातडीने हजर होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करुन संबंधीत घटक प्रमुखांनी अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३. उपरोक्त आदेशांच्या अनुषंगाने संबंधीत अधिकाऱ्यांना त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या (नवीन नियुक्तीच्या) ठिकाणी कार्यमुक्त केल्याची, तसेच ते त्या ठिकाणी रुजू झाल्याची तारीख कृपया तातडीने या कार्यालयास कळवावी. तसेच, ते जर प्रतिनियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत तर तसे या कार्यालयास कळवावे, आणि त्यांच्याविरुध्द या कार्यालयाचे क्र. २/५५०७, दिनांक १६/०९/१९८३, ११/०१/१९८४, व दि. १०/०२/१९९१ तसेच क्र. पोमसं/३/५५०७/६/९७, दि.१३/०२/१९९७ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

**( राजकुमार व्हटकर )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

पोलीस अधीक्षक, अहमदनगर
श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी

प्रत:-

विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
( लक्षवेध :- श्री. भोईटे, कक्ष अधिकारी)

प्रत सस्नेह :-

महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर

प्रत :-

पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई.
कार्यासन अधिकारी, का. क्र. २-अ, ९, ३६ व ४०.
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष

श्री. आनंद अप्पासाहेब भोईटे, पोलीस उप अधीक्षक, श्री. साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी या प्रतिनियुक्तीच्या पदावर रुजू होण्यासाठी कार्यमुक्त करणेबाबत....

२०/९

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन आदेश क्र. रापोसे-२२१७/प्र.क्र.१४६/पोल-१अ
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: १९ सप्टेंबर, २०१७

Desk 2

संदर्भ:-१.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं /२/ प्रतिनियुक्ती -शिर्डी-संस्थान/९२/२०१७, दि. २६.०७.२०१७.
२. विधी व न्याय विभाग, शासन आदेश क्र. सांसवि-१०१७/प्र.क्र.९४/का.१६, दि. १.९.२०१७.

**शासन आदेश :-**

श्री.साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव, सन २०१७-१८ च्या पार्श्वभूमीवर श्री. साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे शताब्दी कक्ष स्थापन करण्यासाठी श्री. साईबाबा संस्थानच्या आस्थापनेवर विधी व न्याय विभागाच्या दि. ३०.५.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये तात्पुरत्या स्वरुपातील अस्थायी पदे निर्माण करण्यात आली आहेत. सदर अस्थायी पदांमध्ये पोलीस उप अधीक्षक (रु. १५६००-३९१००+ ग्रेड पे ५४००) या संवर्गातील १ अस्थायी पदाचा समावेश आहे. विधी व न्याय विभागाच्या संदर्भाधीन आदेशान्वये सदर तात्पुरत्या स्वरुपातील अस्थायी पदावर श्री. आनंद अप्पासाहेब भोईटे, उप विभागीय पोलीस अधिकारी, ग्रामीण उपविभाग, अहमदनगर यांची प्रतिनियुक्तीद्वारे नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. आनंद भोईटे यांना सदर प्रतिनियुक्तीच्या पदावर रुजू होण्यासाठी कार्यमुक्त करण्यात येत आहे.

२. श्री. आनंद आप्पासाहेब भोईटे यांच्या सदर पदावरील प्रतिनियुक्तीचा कालावधी ते सदर पदावर रुजू झाल्याच्या दिनांकापासून दि. ३१.३.२०१९ पर्यंतच्या कालावधीसाठी राहिल.

३. श्री. आनंद भोईटे यांची प्रतिनियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी महासंचालक व पोलीस महानिरीक्षक यांनी कार्यमुक्त करण्याबाबतची आवश्यक कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(कैलास गायकवाड)
उप सचिव, गृह विभाग

प्रति,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रतिलिपी:-

महालेखापाल-१/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री (गृह) शहर/ग्रामीण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
पोलीस अधीक्षक, अहमदनगर
जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर
उपसचिव, (कार्या.१६), विधी व न्याय विभाग
संबंधित पोलीस अधिकारी (पोलीस महासंचालक यांचे मार्फत)
निवड नस्ती